आजारी लघुउद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी ज्या सोयी सवलती देण्यात येतात त्यामध्ये वाढीव सवलत देणे.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- एसआयसी-२००७/(१/०७) उद्योग-१०
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- ३० मार्च, २००७

वाचा :- १) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक एसयुसी-१०८८/ (८११) उद्योग-१०, २६ मार्च,१९९२.
२) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक एसयुसी-१०९६/ (६०४) उद्योग-१०, १४ मे,१९९६.
३) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक एसयुसी-२००१/ (२८११) उद्योग-१०, २१ एप्रिल,२००१. शुध्दिपत्रक,
४) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन [illegible] क्रमांक एसयुसी-२००१/ (२९५१) उद्योग-१०, ७ जुन,२००१.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र उद्योग गुंतवणूक व मूलभत सुविधा धोरण २००६ नुसार राज्य शासनातर्फे आजारी लघुउद्योगांचे पुनरुज्जीवन होणेसाठी सवलती देण्याचे ठरविले आहे, तसेच ज्या औद्योगिक घटकाचे पुनरुज्जीवन शक्य नाही अशा घटकांना औद्योगिक व्यवसायातून सुलभरित्या गमन होण्याच्यादृष्टोने शासनाने विविध सवलती देण्याचे जाहीर केले आहे. त्या अनुषगांने संदर्भाकिंत शासन निर्णय क्र. १ ते ४ मध्ये सदर धोरणानुसार पुढील बाबीचा अंतर्भाव करुन शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

१) रिझर्व बॅक ऑफ इंडियाने केलेल्या व्याख्येनुसार असलेल्या आजारी उद्योगांना वित्तीय सहाय्य करणा-या वित्तीय संस्था/बॅंक यांनी बनविलेल्या पुनरुज्जीवन योजेनेत राज्य शासनातर्फे पुढीलप्रमाणे सोयी सवलती देण्यात येतील. शुश्रुषा कार्याक्रम अमंलात येण्याच्या दिनांका दिवशी राज्य शासनाची सर्व देणी म्हणजेच विक्रीकर, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या थकबाकीची मूळ रक्कम, व्याज व दंडनीय व्याज इत्यादींसह जी एकुण रक्कम येईल ती सर्व रक्कम थकबाकी म्हणून समजण्यात यावी. आजारी घटकाने ही संपूर्ण रक्कम जास्तीत जास्त ६० मासिक हप्त्यामध्ये व त्यावर ७ टक्के वार्षिक व्याजाने परतफेड करण्यात यावी.

२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम अंतर्गत आयुक्त (सहकार) यांचेकडे नोंदणीकृत असलेल्या उद्योगांनाही शुश्रुषा कार्यक्रम अंमलात येण्याच्या दिनांका दिवशी राज्य शासनाचे सर्व देणी म्हणजेच विक्रीकर, राज्य विद्युत मंडळाच्या थकबाकीची मूळ रक्कम, व्याज व दंडव्याज, इत्यादीसह जी एकूण रक्कम येईल ती सर्व रक्कम थकबाकी समजण्यात यावी. आजारी घटकांनी ही संपूर्ण रक्कम जास्तीत जास्त ६० हप्त्यांमध्ये व त्यावरील ७ टक्के वार्षिक व्याजाने परतफेड करण्यात यावी.

३) जे घटक पुनरुज्जीवनक्षम नाहीत अशा घटकांना बाहेर पडण्यासाठी स्पेशल ॲमनेस्टी स्कीम द्वारे शासनाची एक रकमी परतावा (वन टाईम सेटेलमेंट) द्वारे राज्य शासनाची देणी देय असलेल्या रकमेपैकी फक्त मुद्दल एक रकमी भरल्यास व्याज व दंडव्याज माफ करण्यात यावे, व सदर योजनेचा लाभ घेण्यासठी उद्योगांनी सर्व रक्कम व्याज व दंडव्याज सोडून दि. ३१.३.२००८ पूर्वी भरणे आवश्यक आहे.

४) एमआयडीसी किंवा सहकारी औद्योगिक वसाहतीतील आजारी उद्योगांना बाहेर पडण्यासठी व त्यासाठी उद्योगाची स्थिर मालमत्ता विकण्यास परवानगी देण्यात येईल. परंतु सदर जागा ही यापुढे स्थानिक विकास नियमानुसार औद्योगिक किंवा सेवा उद्योग या कारणासाठीच वापरण्यात यावी.

५) एमआयडीसी किंवा सहाकारी औद्योगिक वसाहती बाहेरील घटकांनाही बाहेर पडण्यासाठी तसेच स्थिर मालमत्ता विक्रीसाठी परवानगी देण्यात येईल. परंतु त्या जागेचा वापर हा स्थानिक विकास आराखाडयानुसार असलेल्या झोन प्रमाणेच त्याचा पुर्नवापर करण्यात यावा.

उपरोक्त नमुद केलेलया क्र. १ ते ५ बाबी व्यतिरिक्त इतर बाबींच्या सोयीसवलती संदर्भाधीन १ ते ४ शासन निर्णयांमध्ये नमुद केल्याप्रमाणे राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

सही/-
(र.द.मांडे)
शासनाचे उप सचिव

प्रति,

विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.

Regy. Br.Old.C:\WINDOWS\Desktop\documents\Ty.Pool\SUC-GR DT30.3.2007.doc